पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८८३ दिनांक - १९/१२/२०२३**

पीसीबी गुन्हे शाखा,पुणे शहर

**खडकी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर**
**मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील खडकी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **अजय उर्फ कावू शिवकुमार पिल्ले,वय-२८ वर्षे,रा.नाईक चाळ,बोपोडी,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह खडकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी कोयता, तलवार, चाकू या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खूनाचा प्रयत्न, घातक हत्याराने दुखापतीसह जबरी चोरी, बेकायदा हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०३ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.राजेंद्र सहाणे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस स्टेशन,पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी चालु वर्षा मध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ७१ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.